जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२२/०५/२०२३
## दि.२१/०५/२०२३ रोजी रात्री ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३१७/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,५०६,१४३,१४८,१४९,४२७,आर्म ॲक्ट ४(२५), महा.पो.का.क.३७(१)(३) /१३५ |
| **फिर्यादी** | एक महिला वय-४२ वर्षे,आंबेगाव,पुणे |
| **आरोपीत** | एकुण चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०५/२०२३ रोजी २३/१४ वा.हरणाई कॉम्प्लेक्स,भेंडी चौका जवळ,आंबेगाव-बुद्रुक,पुणे येथील पार्किंग व जीन्या मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मुलगा चंद्रकांत माने याचेसह बाहेर जाण्यासाठी निघाले असताना,यातील नमुद इसमांनी सदर ठिकाणी येवुन,चंद्रकांत माने याचे मुलांबरोबर झालेल्या जुन्या भांडणाचा राग मनात धरुन, त्यांना जीवे मारण्याचे उद्देशाने कुठल्यातरी धारदार हत्यार फेकुन मारले. त्यावेळी ते हत्यार सोसायटी मध्ये असलेल्या सभासदांच्या नावाच्या बोर्डावर लागला. त्यानंतर चंद्रकांत यास दारुच्या मोकळ्या बाटल्या व दगड फेकुन मारले. तसेच फिर्यादी व त्यांची मुलगी हे भांडणे सोडविण्यासाठी मध्ये आले असता,त्यांनाही शिवीगाळ करुन,जीन्यातील रिलींगचे नुकसान करुन,जीवे मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.आर.कर्चे ९५९४६१५५३३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३१५/२०२३,भादविक २७९,३०४(अ),३३७ मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | वंदना भरेकर,वय ३८ वर्षे,रा.धायरीगाव,पुणे |
| **आरोपीत** | मिक्सर ट्रकवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०५/२०२३ रोजी १६/०९ वा. कात्रजकडुन स्वारगेटकडे जाणा-या रोडवर भारती विदयापीठ समोरील स्वारगेटकडे जाणा-या लेनवर भुयारी मार्गावरती |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांची चुलती दुर्गा कुंडलीक जावळकर,वय-५४ वर्षे,रा.कात्रज गाव,खिवंसरा भवन कात्रज,गावठाण,पुणे यांना त्यांचेकडील मोपेड गाडीवर पाठीमागे बसवुन सदर ठिकाणाहुन घेवुन जात असताना, मिक्सर ट्रकवरील चालकाने त्यांचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी दुर्गा जावळकर हिचे डोक्यावरुन ट्रकचे समोरील डाव्या बाजुचे चाक घालुन,त्यांना गंभीर जखमी करून,तीचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. देशमुख ९७६५३९०९४३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ३९८/२०२३,भादविक २७९,३३७,३३८,४२७,मो.वा.का.क.१८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | चित्रा खरे,वय ४८ वर्षे रा.पेपर गल्ली,पुणे |
| **आरोपीत** | खासगी बस चालक व अँम्ब्युलन्स वरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०५/२०२३ रोजी ०७/४५ वा.फुलगाव ते तुळापुर जाणारे रोडवर व फुलगाव शिवार,खुटवड यांचे शेतातुन गेलेले रोडलगतचे खड्डयात ता.हवेली जि.पुणे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे इतर पाच महिला साथीदार यांचेसह ओझर व लेण्याद्री गणपती दर्शनाकरीता बस मध्ये बसुन प्रवास करीत असताना,यातील नमुद खासगी बस चालकाने त्याचे ताब्यातील बस ही हयगयीने व निष्काळजीपणे रोडचे परिस्थीतीकडे लक्ष न देता भरधाव वेगात चालवुन,सदर ठिकाणी शेतातुन गेलेले रोडलगतचे खड्डयात घालुन,बस डावे बाजुस पलटी होवुन,फिर्यादी तसेच इतर नऊ महिला यांना किरकोळ व गंभीर दुखापत करण्यास खासगी बसचालक हा कारणीभुत झाला. तसेच पाच महिला यांना उपचारासाठी अँम्ब्युलन्स मधुन घेवुन जाताना,सदरची अँम्ब्युलन्स ही फुलगाव ते तुळापुर जाणारे रोडचे कडेला पलटी होवुन एकुण पाच महिला यांना किरकोळ जखमी करण्यास अँम्ब्युलन्स चालक हा कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. सुहास पाटील ९१३७२४३०५६ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे १६०/२०२३,भादविक ३८१ |
| **फिर्यादी** | एक जेष्ठ महिला,वय ७८ वर्षे,रा.घोरपडी,पुणे |
| **आरोपीत** | एक कामगार महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०४/२०२३ रोजी २०/०० वा.ते दि.३०/०४/२०२३ रोजी १७/०० वा.चे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे राहते घरी कामगार महिला ही घरकाम करीत असताना,सदर महिला हिने घरकाम करीत असताना,फिर्यादी यांची नजर चुकवुन,त्यांचे घरातील रोख ५०,०००/- रुपये व हिरेजडीत सोन्या-चांदीचे व मोत्याचे दागिने असा एकुण २५,३९,९७९/- रूपये किंमतीचा ऐवज चोरी करुन नेला आहे. (सदरचा गुन्हा हा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी अर्जावरुन दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. संदिप जोरे ९४०३५४७५०१ |

**<u>दि.२१/०५/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा. पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अंलकार पो स्टे ७९/२०२३,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | अक्षय चव्हाण,वय २३ वर्षे,रा.एरंडवणा,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०५/२०२३ रोजी रात्रौ १२/०० ते १२/१५ वा.चे दरम्यान पटवर्धन बाग ते सी.डी.एस.एस. चौक दरम्यान पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पायी जात असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील २०,०००/- रुपये किंमतीची सोन्याची चेन जबरी चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सपताळे ९९२३७५०३२१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**